# पवित्र प्रणालीमार्फत शिक्षण सेवक/शिक्षक पदाकरिता उमेदवारांसाठी सूचना :
## (दि.१९/०६/२०१९)

### (A) सर्वसाधारण सूचना :

१. प्राधान्यक्रम भरण्याची प्रक्रिया उमेदवाराने स्वतःच करणे आवश्यक आहे.

२. संबंधित शैक्षणिक व व्यावसायिक अर्हतेच्या अभ्यासक्रमातील सर्व सत्रांच्या परीक्षा उमेदवाराने दि.२२/११/२०१७ अखेर उत्तीर्ण असणे आवश्यक आहे. अगोदरच्या सत्रातील/वर्षातील परीक्षेत अनुत्तीर्ण असल्यामुळे कोणत्याही टप्प्यावरील निकाल राखून ठेवण्यात आला असल्यास संबंधित शैक्षणिक अर्हता धारण केली असे मानण्यात येणार नाही.

३. उमेदवाराने वय, शैक्षणिक व व्यावसायिक अर्हता, जात प्रवर्ग, उन्नत गटात मोडत नसल्याबाबत, दिव्यांग व्यक्ती, महिला, माजी सैनिक, अंशकालीन, अनाथ, खेळाडू, प्रकल्पग्रस्त, भूकंपग्रस्त इ. संदर्भात न चुकता निसंदिग्ध/निर्विवादपणे दावा करणे आवश्यक आहे.

4. सामाजिक व आर्थिकदृष्टया मागासवर्ग प्रवर्गातील तसेच खुल्या प्रवर्गातील आर्थिकदृष्टया दुर्बल घटकातील उमेदवारानी त्यांचे दाखले सादर करणे बंधनकारक राहील. सा.प्र.वि.शासन निर्णय दि.१२/०२/२०१९ मध्ये नमूद केल्यानुसार उमेदवाराने पात्रता प्रमाणपत्र शासन निर्णयाच्या दिनांकापासून ६ महिन्यांच्या आत सादर करणे आवश्यक राहील. EWS प्रवर्गासाठी non creamy layer प्रमाणपत्राची आवश्यकता नाही, त्यांचेसाठी सक्षम प्राधिकारी यांनी दिलेले EWS प्रमाणपत्र आवश्यक राहील.

५. संबंधित संस्थेकडे विविध प्रकारचा दावा करताना शासनाकडून वेळोवेळी निर्गमित करण्यात आलेले सुधारित शासन निर्णय, शासन परिपत्रक व आदेश लक्षात घेणे आवश्यक राहील. त्या संदर्भातील सर्वस्वी जबाबदारी संबंधित उमेदवाराची राहील.

६. दिलेल्या माहितीच्या आधारे उमेदवारास निवडीसाठी तात्पुरते पात्र समजण्यात येईल. अर्जामध्ये दिलेली पात्रतेविषयक माहिती मूळ कागदपत्रांच्या/प्रमाणपत्रांच्या आधारे तपासण्यात येईल व त्याच्या आधारे पात्र आढळून आल्यानंतरच उमेदवाराची नियुक्ती करण्यात येईल. अन्यथा त्यांची निवड कोणत्याही टप्प्यावर रद्द करण्यात येईल व उमेदवार अनुषंगिक कायदेशीर कारवाईस पात्र ठरेल.

७. नियमानुसार नियुक्तीसाठी पात्र असणाऱ्या उमेदवारांना शारीरिक व मानसिकदृष्टया पात्र असल्याचे सक्षम प्राधिकऱ्यांकडून प्रमाणित करणे आवश्यक राहील.

८. पवित्र प्रणालीमध्ये हेतुपुरस्सर खोटी, चुकीची व अपूर्ण माहिती देणे किंवा खरी माहिती दडवून ठेवणे किंवा त्यात बदल करणे किंवा पाठविलेल्या दाखल्याच्या प्रतीतील नोंदीत अनधिकृतपणे खाडाखोड करणे किंवा खाडाखोड केलेले अथवा बनावट दाखले सादर करणे तसेच विहित केलेल्या अर्हतेच्या अटी पूर्ण न करणारा अथवा गैरवर्तणूक करणारा उमेदवार निवड प्रक्रियेच्या कोणत्याही टप्प्यावर निवड होण्यास अपात्र ठरेल आणि इतर योग्य अशा शिक्षेस पात्र राहील.

९. सदरहू भरती प्रक्रियेसाठी राज्यातील कोणत्याही कार्यालयातील अधिकारी, कर्मचारी तसेच अशासकीय व्यक्ती यापैकी कोणाचीही अभिकर्ता/माध्यम म्हणून नियुक्ती केलेली नाही. नोकरी मिळवून देतो असे सांगून फसवणूक करणाऱ्यांपासून तसेच तोतयागिरीपासून अर्जदाराने सावध रहावे.

१०. उमेदवारांनी प्रवित्र प्रणालीबाबतचा शासन निर्णय दि.०७/०२/२०१९ मधील तरतुदीनुसार प्राधान्यक्रम नमूद करावेत. तसेच पदभरतीशी निगडित विविध शासन निर्णय काळजीपूर्वक वाचावेत.

(B) **<u>शैक्षणिक व व्यावसायिक पात्रता</u>** :

१. इ. १ ली ते ५ वी, ६ वी ते ८ वी, ९ वी ते १० वी व ११ वी ते १२ वी यासाठी शैक्षणिक व व्यावसायिक अर्हता शालेय शिक्षण व क्रीडा विभागाच्या शासन निर्णय क्र. संकीर्ण २०१८/प्र.क्र. ३९७/टीएनटी-१, दिनांक ०७/०२/२०१९, शुद्धिपत्रक दिनांक २५/२/२०१९, दि.१६ मे,२०१९ व **दि.१२/०६/२०१९** मध्ये नमूद केल्यानुसार राहील.

२. शिक्षक पात्रता परीक्षेबाबत शालेय शिक्षण विभागाचा शासन निर्णय क्र टीईटी २०१४/प्रक्र२९४/टीएनटी-१ दि.०३ डिसेंबर,२०१४ व शासन निर्णय क्र संकिर्ण-२०१८/प्रक्र ३११/टीएनटी-१ दि.०१ जानेवारी,२०१९ नुसार अर्हता आवश्यक आहे.

३. संबंधित पदाच्या वर्तमानपत्रात/संकेतस्थळावर प्रसिद्ध केलेल्या जाहिरातीमध्ये नमूद केलेल्या विहित शैक्षणिक व व्यावसायिक अर्हता दि.२२/११/२०१७ अखेर उतीर्ण असणे आवश्यक राहील. सदरची शैक्षणिक व व्यावसायिक अर्हता मान्यताप्राप्त बोर्ड, विद्यापीठ यांचेकडून प्राप्त केलेली असणे आवश्यक राहील.

४. संबंधित पदाच्या सेवाप्रवेश नियमामध्ये तरतूद असल्यासच महाराष्ट्र शासनाने समतुल्य शैक्षणिक अर्हता म्हणून मान्य केलेल्या पदवी/पदविका स्वीकारार्ह असतील.

५. पवित्र प्रणालीवर देण्यांत आलेल्या जाहिरातीमध्ये अर्हता संक्षिप्त मध्ये नमूद करण्यात आलेली आहे. अर्हतेचा तपशील खालील प्रमाणे आहे. (सविस्तर तपशीलासाठी अ.क्र. १ व २ वर नमूद शासन निर्णय पहावेत.)

(i) इ. १ ली ते ५ वी साठी शैक्षणिक व व्यावसायिक अर्हता- उच्च माध्यमिक उतीर्ण (खुल्या प्रवर्गासाठी- ४५ टक्के गुणांसह व मागासवर्गीय प्रवर्गासाठी- ४० टक्के गुणांसह) व व्यावसायिक अर्हता -D.ED/D.El.Ed./D.T.Ed./D.Ed (Special Education)/TCH आणि TET Paper 1 or TET Paper -2 or CTET Paper 1 or CTET Paper 2 PASS (अभियोग्यता व बुद्धिमत्ता चाचणीपूर्वी उत्तीर्ण आवश्यक )

(ii) इ. ६ वी ते ८ वी साठी शैक्षणिक व व्यावसायिक अर्हता- संबंधित विषयातील पदवी (पदवीच्या अंतिम वर्षी खुल्या प्रवर्गासाठी- ४५ टक्के गुणांसह व मागासवर्गीय प्रवर्गासाठी- ४० टक्के गुणांसह) व व्यावसायिक अर्हता - D.ED/D.El.Ed./D.T.Ed./D.Ed (Special Education)/TCH OR

B.Ed./B.A.Ed./B.Sc.Ed आणि TET Paper 2 OR CTET Paper 2 (अभियोग्यता व बुद्धिमत्ता चाचणीपूर्वी उत्तीर्ण आवश्यक )

(iii) इ. ९ वी ते १० वी साठी शैक्षणिक व व्यावसायिक अर्हता:- संबंधित विषयातील पदवी (पदवीच्या अंतिम वर्षी खुल्या प्रवर्गासाठी- ५० टक्के गुणांसह व मागासवर्गीय प्रवर्गासाठी- ४५ टक्के गुणांसह) व व्यावसायिक अर्हता - B.Ed./B.P.Ed/B.A.Ed./B.Sc.Ed

(iv) इ. ११ वी ते १२ वी साठी शैक्षणिक व व्यावसायिक अर्हता- संबंधित विषयातील पदव्युतर पदवी (खुल्या प्रवर्गासाठी- ५० टक्के गुणांसह व मागासवर्गीय प्रवर्गासाठी- ४५ टक्के गुणांसह) व व्यावसायिक अर्हता - B.Ed. /BA.Ed./Bsc.Ed

६. इ. १ ली ते इ. ५ वी अपदवीधर गटासाठी उमेदवारांनी माध्यमिक शालांत परीक्षा,उच्च माध्यमिक प्रमाणपत्र परीक्षा,व डी.एड. या शैक्षणिक व व्यावसायिक अर्हता ज्या माध्यमातून घेतली असेल त्या सर्व माध्यमाचे प्राधान्यक्रम उमेदवारांना उपलब्ध असतील.

७. इ. ६ वी ते इ.८ वी पदवीधर गटासाठी उमेदवारांनी उच्च माध्यमिक प्रमाणपत्र परीक्षा,पदवी परीक्षा व डी.एड.अथवा बी.एड या शैक्षणिक व व्यावसायिक अर्हता ज्या माध्यमातून घेतली असेल त्या सर्व माध्यमाचे प्राधान्यक्रम उमेदवारांना उपलब्ध असतील.

८ इ.९ वी ते इ.१० वी पदवीधर गटासाठी उमेदवारांनी उच्च माध्यमिक प्रमाणपत्र परीक्षा,पदवी परीक्षा व बी.एड./बी.पी.एड.(शारीरिक शिक्षण या विषयाच्या पदासाठी) या शैक्षणिक व व्यावसायिक अर्हता ज्या माध्यमातून घेतली असेल त्या सर्व माध्यमाचे प्राधान्यक्रम उमेदवारांना उपलब्ध असतील.

९. इ.११ वी ते इ.१२ वी या गटासाठी उमेदवारांनी पदवी,पदव्युत्तर पदवी परीक्षा व बी.एड./एम.पी.एड.(शारिरिक शिक्षण या विषयाच्या पदासाठी) या शैक्षणिक व व्यावसायिक अर्हता ज्या माध्यमातून घेतली असेल त्या सर्व माध्यमाचे तसेच संस्थांचे जाहिरातीतील माध्यम व विषय शिकविण्याचे माध्यमाचे प्राधान्यक्रम उमेदवारांना उपलब्ध असतील.

१०. उमेदवार ज्या भाषा विषयासाठी पात्र असेल,अशा उमेदवारांना जाहिरातीतील संबंधित भाषा विषयाचे प्राधान्यक्रम उपलब्ध असतील.

११. बृहन्मुंबई मनपातील Bombay Public School शाळांतील रिक्त जागांसाठी, जे उमेदवार त्यांचे संपूर्ण शिक्षण (शैक्षणिक व व्यावसायिक) इंग्रजी माध्यमातून उतीर्ण झाले आहेत तेच उमेदवार पात्र आहेत. तसेच बृहन्मुंबई मनपातील अन्य इंग्रजी माध्यमाच्या शाळांतील रिक्त जागांसाठी, ज्या उमेदवारांची शैक्षणिक अर्हता अन्य माध्यमातून व व्यावसायिक अर्हता(D.Ed./B.Ed.) केवळ इंग्रजी माध्यमातून उतीर्ण केलेली असेल तेच उमेदवार पात्र असणार आहेत.

१२. मुंबई मनपाने दिलेली दैनिक लोकसता, सकाळ, फ्रीप्रेस जर्नल, पुण्यनगरी, मिड डे, जागरुक टाईम्स, इन्कलाब डेली, महाराष्ट्र टाईम्स, वृत्तमानस, नवभारत, यशोभूमी, मुंबई समाचारमध्ये दि.०८/०५/२०१९ रोजी दिलेल्या जाहिराती देखील सुलभ संदर्भासाठी पहाव्यात.

१३. उमेदवारास एकापेक्षा अधिक माध्यमाचे प्राधान्यक्रम दिसत असले तरी आपण ज्या माध्यमातून अध्यापन करण्यास सक्षम आहात त्याच माध्यमाचे प्राधान्यक्रम द्यावेत.

१४. आपण निवडलेल्या माध्यमातून आपली शिक्षणसेवक/शिक्षक पदासाठी निवड झाल्यास आपला परीविक्षा कालावधी पूर्ण करण्यापूर्वी संबंधित माध्यमातून शासन वेळोवेळी विहित करेल ती अध्यापनाबाबतची चाचणी परीक्षा उतीर्ण करावी लागेल.

१५. उमेदवारांना दि.३१/०५/२०१९ अखेर शैक्षणिक व व्यावसायिक अर्हता (TET /CTET 2018 वगळता ) अद्ययावत करण्याची सुविधा दिलेली आहे. परंतु हे स्पष्ट करण्यात येत आहे की, शासन निर्णय दि.२३/०६/२०१७ मधील मुद्दा क्र ७ मध्ये नमूद केल्यानुसार अभियोग्यता आणि बुद्धिमत्ता चाचणी परीक्षेसाठी अर्ज करण्याचा शेवटचा दिनांक २२/११/२०१७ हा होता. या संदर्भ दिनांकास संबंधित पदासाठी निर्धारित केलेली शैक्षणिक व व्यावसायिक अर्हता प्राधान्यक्रम उपलब्ध करण्यासासाठी ग्राह्य धरण्यात येणार आहे.

१६. पवित्र पोर्टलसाठी शैक्षणिक व व्यावसायिक अर्हता उत्तीर्ण करण्याच्या माहितीमध्ये महिना व वर्ष इतकीच घेतलेली आहे, त्यामुळे नोव्हेंबर,२०१७ मध्ये नमूद केलेल्या माहितीमध्ये दि.२३/११/२०१७ ते ३०/११/२०१७ या कालावधीत ज्या उमेदवारांनी वाढीव शैक्षणिक व व्यावसायिक अर्हता उत्तीर्ण केली आहे त्या उमेदवारांनी प्राधान्यक्रम भरताना त्या वाढीव अर्हतेचे प्राधान्यक्रम भरु नयेत. भरल्यास उमेदवारांची निवड कोणत्याही टप्प्यावर रद्द होईल व यास संबंधित उमेदवार जबाबदार राहील.

१७. बंगाली माध्यमाच्या जागांसाठी उमेदवारांने इ. १२ वी मध्ये बंगाली विषय घेवून उत्तीर्ण उमेदवारांना बंगाली माध्यमाच्या जागा दिसतील त्यासाठी उमेदवाराने प्राधान्यक्रम जनरेट करण्यापूर्वी बंगाली माध्यमासाठी आवश्यक माहिती भरुन Save करणे आवश्यक आहे, आवश्यक माहिती Save केल्यानंतरच बंगाली माध्यमाच्या जागांचे प्राधान्यक्रम Generate होतील अन्यथा होणार नाहीत.

१८. शालेय शिक्षण विभाग शासन शुध्दिपत्रक दि.१२/०६/२०१९ नुसार लोकप्रशासन हा विषय इ.६ वी ते इ. ८ वी, इ. ९ वी ते इ. १० वी व इ. ११ वी ते इ. १२ वी या गटातील सामाजिकशास्त्र या गटात समाविष्ट केला आहे. त्यामुळे या विषयातून पदवी व पदव्युत्तर पदवी उत्तीर्ण झालेल्या उमेदवारांनी प्राधान्यक्रम जनरेट करण्यापूर्वी लोकप्रशासन या विषयाची आवश्यक शैक्षणिक माहिती भरुन Save करणे आवश्यक आहे, आवश्यक माहिती Save केल्यानंतरच लोकप्रशासन या विषयासाठी इ ६ वी ते इ ८ वी , इ ९ वी ते इ १० वी या गटासाठी सामाजिकशास्त्र व इ ११ वी ते इ १२ वी राज्यशास्त्र या विषयाच्या पदांचे प्राधान्यक्रम Generate होतील अन्यथा होणार नाहीत.

## (C) वयोमर्यादा :

१. उमेदवारांचे दि.२२/११/२०१७ रोजीचे असलेले वय ग्राहय धरण्यात येईल.

२. शालेय शिक्षण विभागाचा शासन निर्णय दि. २३/०६/२०१७ व दि.७/२/२०१९ नुसार शिक्षण सेवक पदासाठी किमान वयोमर्यादा १८ वर्षे व कमाल वयोमर्यादा खुल्या प्रवर्गातील उमेदवारांकरिता ३८ वर्षे राहील. मागासवर्गीय प्रवर्गातील उमेदवारांकरिता ४३ वर्षे राहील. वयोमर्यादेची गणना महाराष्ट्र शासनाकडून वेळोवेळी निर्गमित होणाऱ्या शासन निर्णयांमधील तरतुदीनुसार लागू राहील.

३. शासन निर्णयात नमूद केलेल्या पात्र खेळाडूंची गुणवत्ता व पात्रता विचारात घेऊन कमाल वयोमर्यादेत ५ वर्षापर्यंत वयाची अट शिथिल करण्यात येईल.

४. पात्र दिव्यांग उमेदवारांसाठी उच्च वयोमर्यादा वयाच्या ४५ वर्षापर्यंत शिथिलक्षम राहील.

५. प्रकल्पग्रस्त/भूकंपग्रस्त उमेदवारांसाठी उच्च वयोमर्यादा वयाच्या ४५ वर्षापर्यंत शिथिलक्षम राहील.

६. सामान्य प्रशासन विभाग,शासन निर्णय क्र.अंशका १९१८/प्र.क्र.५०७/१६-अ, दि. २ जानेवारी २०१९ नुसार अंशकालीन उमेदवारांसाठी वयोमर्यादा ५५ वर्षांपर्यंत शिथिलक्षम राहील.

७. शासन शुद्धिपत्रक सामान्य प्रशासन विभाग क्र. १०१०/प्र.क्र. २७९/१०/१६-अ, दि. २० ऑगस्ट २०१० नुसार माजी सैनिकांसाठी शासन सेवेतील गट क व गट ड मधील पदांसाठी नेमणुकीकरिता विहित वयोमर्यादेतील सूट ही सदर उमेदवाराच्या सशस्त्र दलात झालेल्या सेवेइतका कालावधी अधिक तीन वर्षे इतकी राहील.

८. माजी सैनिकांना असलेल्या वयोमर्यादेतील सवलतीच्या प्रयोजनार्थ उमेदवारांनी शासन निर्णय दि.२५ ऑक्टोबर २००५ च्या परिशिष्टामध्ये दिलेल्या नमुन्यात सक्षम प्राधिकाऱ्यांनी (लागू असेल त्याप्रमाणे) प्रदान केलेले प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे. माजी सैनिकांसाठी आरक्षित असलेल्या पदावर शिफारशीसाठी पात्र उमेदवार उपलब्ध न झाल्यास त्यांच्यासाठी आरक्षित असलेली पदे त्या त्या प्रवर्गातील गुणवत्ताक्रमानुसार अर्हताप्राप्त उमेदवारांमधून भरण्यात येतील.

## (D) **निवडीची कार्यपद्धती** –

१) उमेदवाराने पवित्र प्रणालीमध्ये भरलेल्या माहितीच्या आधारे [जात प्रवर्ग, समांतर आरक्षण, वय,शैक्षणिक व व्यावसायिक पात्रता इ.] ज्या संस्थेमधील रिक्त पदावर अर्ज करण्यास उमेदवार पात्र ठरत असेल त्या व्यवस्थापननिहाय संस्थांची पदनिहाय प्राधान्यक्रम भरण्यासाठीची यादी संबंधित उमेदवारास त्यांचे log in वर Preferances Generate करून Download केल्यानंतर दिसेल. यामधून उमेदवाराने त्यांच्या पसंतीच्या संस्थेतील पदे निवडून योग्य ते प्राधान्यक्रम द्यावयाचे आहेत. प्राधान्यक्रम देताना तो विचारपूर्वक देणे आवश्यक आहे. प्राधान्यक्रम अंतिम (Lock Preferances) केल्यानंतर त्यामध्ये कोणत्याही परिस्थितीत बदल करता येणार नाही.

२) पवित्र प्रणालीमध्ये उमेदवारांनी स्वतःची माहिती स्वप्रमाणित केलेली आहे, सदर माहितीच्या आधारे उमेदवारास पात्र असणारी पदे प्राधान्यक्रम भरण्यासाठी उपलब्ध करून दिलेले आहेत. उमेदवाराने स्वतः या पदांसाठी पात्र असल्याची खात्री करुन संबंधित पदांचेच प्राधान्यक्रम भरावेत.

३) पवित्र प्रणालीअंतर्गत पदभरतीसाठी मा.उच्च न्यायालय,खंडपीठ औरंगाबाद येथील याचिका क्र. २९५६/२०१९ व अन्य याचिकांवरील निर्णयांच्या अधिन राहून प्राधान्यक्रम भरण्याची सुविधा देण्यात येत आहे. याबाबत मा.न्यायालयाने दिलेल्या आदेशानुसार कार्यवाही करण्यात येईल.

४) प्राधान्यक्रम भरण्याबाबत संकेतस्थळावर मार्गदर्शक व्हिडीओ तसेच वारंवार विचारले जाणारे प्रश्न (FAQs) यांची सुविधा उपलब्ध आहे. तसेच विभागस्तरीय (विभागीय शिक्षण उपसंचालक)/ जिल्हास्तरीय (शिक्षणाधिकारी प्राथमिक) पवित्र मदत केंद्रावर मार्गदर्शन घेता येईल.

५) उमेदवार त्याच्या बुद्धिमत्ता व अभियोग्यता (TAIT) च्या परीक्षेतील प्राप्त गुण, जातीचा प्रवर्ग,समांतर आरक्षण, विषय, शैक्षणिक व व्यावसायिक पात्रता इ.च्या आधारे ज्या प्राधान्यक्रमावर जागा उपलब्ध असेल त्या जागेसाठी पात्र समजला जाणार आहे. उमेदवार प्राधान्यक्रमानुसार ज्या जागेसाठी नियुक्ती /मुलाखतीसाठी पात्र समजला जाईल. त्यानंतर त्याचे उर्वरित प्राधान्यक्रम विचारात घेतले जाणार नाहीत. त्यामुळे उमदेवारांनी त्यांच्या शैक्षणिक व व्यावसायिक पात्रता,उपलब्ध जागा, (TAIT) च्या परीक्षेतील प्राप्त गुण इ.बाबीचा अभ्यास करुन योग्य ते प्राधान्यक्रम नमूद करावेत.

६) प्राधान्यक्रम दोन भागांमध्ये उपलब्ध करून देण्यात आला आहे. उमेदवाराने प्रथम भागामध्ये स्थानिक स्वराज्य संस्था (उदा.जिल्हा परिषद, मनपा, नप इ.) यातील पदे व ज्या खाजगी संस्थातील मुलाखतीशिवाय बुध्दीमता व अभियोग्यता (TAIT) परीक्षेतील गुणवत्तेच्या आधारे थेट नियुक्ती करावयाच्या पदांसाठी पात्रतेनुसार प्राधान्यक्रम देण्यात यावा. तसेच दुसऱ्या भागात खाजगी संस्थातील जी पदे मुलाखतीनंतर पात्र ठरणार आहेत अशा पदांसाठी प्राधान्यक्रम देण्यात यावेत.

७) जो उमेदवार मुलाखतीशिवाय गुणवत्तेच्या आधारे थेट नियुक्ती करावयाच्या पदासाठी पात्र ठरेल त्याचा मुलाखतीसहीत नियुक्ती करावयाच्या खाजगी संस्थेमधील पदाच्या पात्रतेसाठी विचार केला जाणार नाही. त्यामुळे उमेदवाराने प्राधान्यक्रम विचारपूर्वक द्यावेत.

८) अभियोग्यता व बुध्दीमत्ता चाचणीतील (TAIT) गुणांच्या आधारे इतर अटी व शर्ती पूर्ण करणारे उमेदवार स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये थेट निवडीस पात्र असणार आहेत. यासाठी मुलाखत घेतली जाणार नाही. तसेच ज्या संस्थांनी उमेदवार निवडीसाठी मुलाखतीशिवाय असा पर्याय निवडला असेल त्यांना देखील १:१ या प्रमाणात नियुक्तीसाठी उमेदवार पाठविले जाणार आहेत.

९) मुलाखतीशिवाय भरती प्रक्रियेसाठी १:१ या प्रमाणात उमेदवार पात्र ठरवले जाणार आहेत. पात्र ठरलेले उमेदवार विहित कालावधीत संबंधित पदावर कोणत्याही कारणांमुळे रुजू न होणे, कागदपत्र पडताळणीमध्ये अपात्र ठरणे इत्यादी कारणांमुळे रिक्त राहणारी पदे भरण्याबाबत या भरतीप्रक्रियेत विचार केला जाणार नाही.

१०) मा. उच्च न्यायालयाच्या आदेशानुसार मुलाखतीसहीत नियुक्ती करावयाच्या खाजगी संस्थेमधील पदांसाठी १:१० या प्रमाणात मुलाखतीसाठी पात्र ठरविले जाणार आहेत. खाजगी व्यवस्थापनाच्या शाळांकरिता प्रत्येक रिक्त जागेकरिता उपलब्ध असल्यास समांतर आरक्षणासह मुलाखतीसाठी १:१०

या प्रमाणात उमेदवाराचा गुणानुक्रम प्राधान्यक्रम, ,माध्यम, प्रवर्ग, विषय व बिंदुनामावलीनुसार उच्चतम गुणप्राप्त उमेदवारांची मुलाखतीसाठी निवडसूची संस्थेस उपलब्ध करुन देण्यात येईल.

११) खाजगी शैक्षणिक संस्थेतील पदभरतीसाठी उमेदवाराने दिलेल्या प्राधान्यक्रमानुसार गुण, प्राधान्यक्रम आरक्षण इ. पात्रता विचारात घेवून जास्तीत जास्त १० पदांकरिता मुलाखतीसाठी उमेदवार निवडला जाणार आहे. या सर्व संस्थांच्या मुलाखत व अध्यापन कौशल्य चाचणीचा कालावधी स्वतंत्रपणे देण्यात येईल. संपूर्ण राज्यभरातील सर्व खाजगी संस्थातील मुलाखती ठरावीक कालावधीमध्ये घेण्यात येतील. मुलाखत व अध्यापन कौशल्य चाचणी देण्यासाठी उमेदवारास पुरेसा कालावधी मिळेल याची दक्षता घेतली जाईल.

१२) खाजगी शैक्षणिक संस्थेतील मुलाखतीसह पदभरतीबाबत अभियोग्यता व बुध्दिमत्ता चाचणी (TAIT) परीक्षेतील गुण मुलाखतीच्या वेळी विचारात घेतले जाणार नाहीत. उमेदवाराची अंतिम निवड ही मुलाखत व अध्यापन कौशल्य यातील गुणांच्या आधारे होणार आहे. उमेदवारांची मुलाखत व अध्यापन कौशल्य ही एकूण ३० गुणांची असेल. तथापि मुलाखतीसाठी निवडलेल्या उमेदवारांचे अभियोग्यता व बुध्दिमत्ता चाचणी (TAIT) परीक्षेतील गुणही सर्व संस्थांना कळवण्यात येतील व मा.उच्च न्यायालयाच्या निर्देशाप्रमाणे संस्थेकडे प्राप्त झालेल्या यादीतील (TAIT) परीक्षेतील सर्वोतम गुण नसणाऱ्या उमेदवारास निवडावयाचे झाल्यास शाळा समितीस लिखित कारणे द्यावी लागतील. संस्थेकडून संबंधित उमेदवारांची मुलाखत घेवून व अध्यापन कौशल्य तपासून त्याआधारे उच्चतम गुण प्राप्त झालेल्या उमेदवारांची संस्था रिक्त पदावर निवड करणार आहे. मुलाखतीस उपस्थित असलेल्या सर्व उमेदवारांची संस्था गुणानुक्रमे यादी तयार करुन संकेतस्थळावर विहित मुदतीत गुणवत्ता यादी प्रसिध्द करेल.

१३) मुलाखतीसह भरतीप्रक्रियेसाठी १:१० प्रमाणात उमेदवार पात्र ठरवले जाणार आहेत. यामधील पात्र ठरलेला उमेदवार विहित कालावधीमध्ये कोणत्याही कारणांमुळे रुजू न होणे, कागदपत्र पडताळणीमध्ये अपात्र ठरणे इत्यादी कारणांमुळे रिक्त राहिलेल्या पदावर संस्था गुणानुक्रमे पुढील उमेदवाराची निवड करेल.

१४) संस्थेने निवड केलेल्या उमेदवारास ७ कार्यालयीन दिवसांमध्ये हजर व्हावे लागेल, उक्त कालावधीमध्ये उमेदवार हजर न झाल्यास संस्था गुणानुक्रमे पुढील उमेदवाराची निवड करेल. निवडलेल्या प्रत्येक उमेदवारास हजर होण्यासाठी कमाल ७ कार्यालयीन दिवसांची मर्यादा असेल.

१५) प्रशासकीय कारणास्तव अंतिम निवडीपूर्वी पदसंख्येत बदल होवू शकतो.

१६) उमेदवारांना पदभरतीसाठी कोणतेही अर्ज शुल्क/फी आकारली जाणार नाही.

१७) प्रथम मुलाखतीशिवाय (स्थानिक स्वराज्य संस्था व मुलाखतीशिवाय निवडीचा पर्याय निवडलेल्या खाजगी संस्था) संस्थासाठी निवड प्रक्रिया राबविली जाणार असून त्यात निवड झालेल्या उमेदवारांचा मुलाखतीद्वारे निवड करणाऱ्या खाजगी संस्थांच्या शाळांमधील पदभरतीसाठी विचार केला जाणार

नाही. या निवडलेल्या उमेदवारांना वगळून इतर उमेदवारांसाठी खाजगी संस्थेकडील पदभरतीची प्रक्रिया राबविली जाणार आहे. या बाबींचा विचार करूनच उमेदवारांनी त्यांचे प्राधान्यक्रम द्यावेत.

१८) उमेदवारांना प्राधान्यक्रम देण्यासाठी कुठलीही मर्यादा नाही. ज्या ज्या पदांसाठी पात्र असेल त्या सर्व संस्था/पदांसाठी त्याच्या पात्रतेनुसार उमेदवारास प्राधान्यक्रम देता येतील.

१९) उर्दु माध्यमाच्या जागासाठी अनु.जाती/एसईबीसी या प्रवर्गातील पात्र उमेदवार उपलब्ध न झाल्यास सदर जागा खुल्या प्रवर्गातून भरण्यासाठी शासनआदेशानुसार कार्यवाही करण्यात येईल.

२०) उमेदवाराने एकुण पात्र पदांपैकी ज्या पदांसाठी प्राधान्यक्रम नोंदविलेले आहेत, फक्त त्याच पदांसाठी त्याचा विचार केला जाईल, पात्र असूनही कांही पदांसाठी प्राधान्यक्रम न दिल्यास उमेदवाराचा त्या पदासाठी विचार होणार नाही.

२१) अनुसूचित जमाती (पेसा क्षेत्र) या प्रवर्गातील रिक्त जागांसाठी प्राधान्यक्रम देताना अनूसुचित जमातीच्या उमेदवारांनी त्यांचे आधिवास पेसा क्षेत्रांतर्गत असेल आणि उमेदवाराने स्वतः त्या स्थानिक ठिकाणाचे रहिवाशी असल्याची खात्री करुन प्राधान्यक्रम देण्यात यावा. उमेदवारांनी प्राधान्यक्रम चुकीचा दिल्यास आणि निवडीनंतर अपात्र ठरल्यास त्याची जबाबदारी उमेदवाराची असेल.

२२) अभियोग्यता व बुध्दिमत्ता चाचणी परीक्षेत (TAIT) समान गुण असलेल्या उमेदवारांबाबत सामान्य प्रशासन विभागाकडील दि. २ डिसेंबर २०१७ रोजीच्या शासन पूरकपत्रानुसार आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांच्या पाल्यांचा समावेश करण्यात आला असून ज्या पात्र उमेदवारांना समान गुण असतील, अशा उमेदवारांचा गुणवत्ता यादीतील प्राधान्यक्रम पुढीलप्रमाणे निश्चित करण्यात येईल –

a) आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांच्या पाल्यास प्रथम प्राधान्य राहील.

b) समान गुणप्राप्त उमेदवारांमध्ये आत्महत्याग्रस्त शेतकऱ्याचा पाल्य नसेल अथवा वरील अ.क्र. १ नुसार एकापेक्षा अधिक उमेदवार समान गुण प्राप्त असतील तर त्यापैकी वयाने ज्येष्ठ असलेल्या उमेदवारास प्राधान्य देण्यात येईल.

c) वरील अनु. क्र. a व b या दोन्ही अटींमध्ये देखील समान ठरत असलेल्या उमेदवारांच्या बाबतीत, अर्ज सादर करण्याच्या अंतिम दिनांकास उच्चतर शैक्षणिक अर्हता (पदव्युत्तर पदवीधर, पदवीधर, उच्च माध्यमिक शालांत परीक्षा उत्तीर्ण, माध्यमिक शालांत परीक्षा उत्तीर्ण अशा प्रकारे) धारण करणाऱ्या उमेदवारास प्राधान्यक्रम देण्यात येईल.

d) वरील अ.क्र. a,b व c या तिन्ही अटींमध्ये देखील समान ठरत असलेल्या उमेदवारांच्या बाबतीत, सदर पदाच्या सेवाप्रवेश नियमामध्ये विहित असलेल्या शैक्षणिक अर्हतेमध्ये उच्चतर गुण प्राप्त उमेदवारास प्राधान्य देण्यात येईल.

(E) **मानधन/वेतनश्रेणी** - स्थानिक स्वराज्य संस्था व खाजगी संस्थांच्या अनुदानित शाळांमधील नियुक्ती ही शिक्षण सेवक म्हणून एकत्रित मानधनावर राहील. अंशतः अनुदानित व विना अनुदानित

शाळांमधील शिक्षक पदावरील नियुक्ती ही विहित वेतनश्रेणीमध्ये राहील. शासन वेळोवेळी ठरवेल त्या प्रमाणे मानधन/वेतनश्रेणी देय राहील.

(F) मागासवर्गीय आरक्षण –

१. मागासवर्गाचे आरक्षण महाराष्ट्र राज्य लोकसेवा (अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, विमुक्त जाती भटक्या जमाती, विशेष मागास प्रवर्ग आणि इतर मागासवर्ग यांच्यासाठी आरक्षण) अधिनियम २००१ आणि तद्नंतर शासनाने यासंदर्भात वेळोवेळी निर्गमित केलेल्या आदेशानुसार राहील.

२. विमुक्त जाती (अ), भटक्या जमाती (ब), भटक्या जमाती (क), भटक्या जमाती (ड), विशेष मागास प्रवर्ग व इतर मागास वर्ग तसेच सामाजिक व आर्थिकदृष्टया मागासवर्ग या मागासवर्गासाठीच्या आरक्षणाबाबतच्या तरतुदी/शासन निर्णय, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग क्र. व्हीजेएनटी २०१४/प्र.क्र. ११८/व्हीजेएनटी १ दि. ३१ जुलै २०१४ आणि तद्नंतर शासनाने यासंदर्भात वेळोवेळी निर्गमित केलेल्या आदेशानुसार राहतील.

३. सन २०१८ चा महाराष्ट्र अधिनियम क्र. ६२, दि. ३० नोव्हेंबर २०१८ अन्वये महाराष्ट्र राज्य सामाजिक व शैक्षणिक मागास (SEBC) वर्गाकरिता "सामाजिक व शैक्षणिक मागास वर्ग" निर्माण करण्यात आला असून या वर्गासाठी सामान्य प्रशासन विभागाचा शासन निर्णय दि.१९/१२/२०१८ अन्वये १६ टक्के आरक्षण देण्यात आले आहे.

४. सामान्य प्रशासन विभागाचा शासन निर्णय क्र. राआधो-४०१९/प्र.क्र.३१/१६-अ, दि. १२ फेब्रुवारी २०१९, दि. १६/२/२०१९ व दि. १८/२/२०१९ अन्वये खुल्या प्रवर्गातील आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांसाठी शासकीय सेवा व शैक्षणिक संस्थांमध्ये प्रवेशाकरिता १०% जागा आरक्षित करण्यात आल्या आहेत.

५. i) शासन परिपत्रक समाजकल्याण, सांस्कृतिक कार्य व क्रीडा विभाग क्र. सीबीसी १०९४/ प्र.क्र.८६/मावक-५, दि. २२ नोव्हेंबर १९९५ तसेच शासन पत्र सामाजिक न्याय, सांस्कृतिक कार्य व विशेष साहाय्य विभाग क्र. सीबीसी-१०/२००६/प्र.क्र. १६२/मावक-५, दि. १८ एप्रिल २००६ मधील आदेशनुसार ज्या व्यक्तीच्या नावे जातीचे प्रमाणपत्र असेल ती व्यक्ती व त्या व्यक्तीचे कुटुंब क्रीमी लेअर मध्ये मोडत नसल्याचे व धारकाच्या नावाने सर्वसाधारण रहिवास प्रमाणपत्रात प्रमाणित करणे आवश्यक आहे.

ii) महाराष्ट्राचे सर्वसाधारण रहिवासी असलेल्या स्थलांतरित मागासवर्गीय उमेदवारांच्या बाबतीत शासन निर्णय समाजकल्याण, सांस्कृतिक कार्य व क्रीडा विभाग क्र. सीबीसी-१०८५/२६३०४/(बीसी डब्ल्यू)-५, दि. ६ ऑक्टोबर १९८६ मधील आदेशानुसार निर्गमित करण्यात आलेली प्रमाणपत्रे ग्राह्य धरण्यात येतील.

iii) उमेदवारांनी ते स्वतः महाराष्ट्र राज्याचे अधिवासी असल्याचे प्रमाणपत्र (Domicile) सादर करणे आवश्यक आहे.

iv) जातीच्या प्रमाणपत्रात उमेदवार आणि त्यांचे कुटुंबीय महाराष्ट्र राज्यात सर्वसाधारण वास्तव्य असल्याची तरतूद करण्यात आली असेल तर अशा प्रकरणी महाराष्ट्र राज्याचे अधिवासी असल्याबाबतचा दाखला सादर करणे उमेदवारास सर्वसाधारणपणे बंधनकारक राहणार नाही. सर्वसाधारण रहिवासी या संज्ञेला भारतीय लोकप्रतिनिधीत्व कायदा, १९५७ च्या कलम २० नुसार जो अर्थ आहे, तोच अर्थ असेल.

v) विमुक्त जाती (अ), भटक्या जमाती (ब), भटक्या जमाती (क), भटक्या जमाती (ड), विशेष मागास प्रवर्ग व इतर मागास वर्ग तसेच सामाजिक व आर्थिकदृष्टया मागासवर्गातील प्रवर्गाचा दावा करणाऱ्या उमेदवारांनी समाजातील उच्च उन्नत व प्रगत गटामध्ये मोडत नाहीत असे अर्जामध्ये स्पष्टपणे नमूद करणे व त्याबाबतच्या प्रमाणपत्राच्या प्रती पडताळणीचे वेळी सादर करणे आवश्यक आहे. विहित प्रमाणपत्राच्या प्रती सादर न केल्यास अशा उमेदवाराचा संबंधित मागास प्रवर्गाचा दावा ग्राहय धरला जाणार नाही.

(G) महिलांसाठीचे आरक्षण –

i) महिलांसाठी असलेले आरक्षण शासन निर्णय महिला व बालविकास विभाग, क्र. ८२/२००९/ मसआ २०००/प्र.क्र. ४१५, का, दि. २५ मे २००१ आणि तद्नंतर शासनाने वेळावेळी निर्गमित केलेल्या आदेशानुसार राहील.

ii) महिलांच्या आरक्षित पदांच्या लाभाकरिता महिला उमेदवार महाराष्ट्र राज्याचा सर्वसाधारणपणे रहिवासी असावा.

iii) महिलांचे आरक्षण हे त्या त्या प्रवर्गासाठी समांतर आरक्षण राहील. तथापि भरतीच्या वर्षात महिलांकरिता आरक्षित पदासाठी त्या त्या प्रवर्गातील महिला उमेदवार उपलब्ध झाल्या नाहीत तर सदर आरक्षण इतरत्र अदलाबदल न करता त्या त्या प्रवर्गातील पुरुष उमेदवारामार्फत भरण्यात येईल.

iv) अमागास महिलांसाठी असलेल्या आरक्षणाचा लाभ घेऊ इच्छिणाऱ्या अमागास महिला उमेदवारांनी अर्जामध्ये न चुकता महाराष्ट्राचे अधिवास (Domicile) असल्याबाबत तसेच व प्रगत गटात मोडत नसल्याबाबत स्पष्टपणे दावा करणे आवश्यक आहे.

v) अमागास/खुल्या प्रवर्गातील महिलांकरिता आरक्षित असलेल्या पदांसाठी दावा करणाऱ्या अराखीव/खुल्या प्रवर्गातील महिला उमेदवारांना सक्षम प्राधिकाऱ्याने प्रदान केलेले उच्च व उन्नत गटात मोडत नसल्याचे प्रमाणपत्र (non creamy layer certificate) नियमानुसार सादर करणे आवश्यक राहील.

vi) शासन निर्णय समाजकल्याण, सांस्कृतिक कार्य व क्रीडा विभाग, क्र. सीबीसी १०९८/प्र.क्र. १५१/मावक ५, दि. ७ मे १९९९ अन्वये शासनाने आंतरजातीय विवाह केलेल्यांना मिळणाऱ्या

मागासवर्गाच्या सवलती/फायदे रद्द केले आहेत. त्यानुसार आंतरजातीय विवाह केलेल्या उमेदवारांनी अर्ज सादर करताना आवश्यक ती दक्षता घ्यावी.

(H) **पदवीधर/पदविकाधारक अंशकालीन उमेदवारांसाठी आरक्षण** :

सामान्य प्रशासन विभाग शासन निर्णय क्र. पअंक-१००९/प्र.क्र. २००/२००९/१६-अ, दि. २७ ऑक्टोबर २००९ अन्वये "सुशिक्षित बेरोजगारांना अर्थसहाय्य" या योजनेअंतर्गत शासकीय कार्यालयामध्ये तीन वर्षापर्यंत दरमहा मानधनावर काम केलेल्या व रोजगार मार्गदर्शन केंद्रामध्ये या अनुभवाची नोंद केलेल्या पदवीधर/पदविकाधारक अंशकालीन उमेदवारांना शासकीय/निमशासकीय सेवेतील महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या कक्षेबाहेरील गट क पदावरील सरळसेवेने करावयाच्या नियुक्त्यांसाठी १० टक्के समांतर आरक्षण लागू राहील. तसेच सामान्य प्रशासन विभाग शासन निर्णय दि.०२/१/२०१९ नुसार सध्याच्या ४६ वर्षे वयोमर्यादेत वाढ करुन ही सवलत ५५ वर्षापर्यंत देण्यात आली आहे. वयोमर्यादा/आरक्षण सवलतीच्या प्रयोजनार्थ उमेदवारांनी सक्षम प्राधिकाऱ्यांनी (लागू असेल त्याप्रमाणे) प्रदान केलेले प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे.

(I) **प्रकल्पग्रस्त व भूकंपग्रस्तांसाठी आरक्षण** :

सामान्य प्रशासन विभाग शासन निर्णय क्र. भूकंप-१००९/प्र.क्र. २०७/२००९/१६-अ दि. २७ ऑगस्ट २००९ अन्वये प्रकल्पग्रस्तांना असलेले ५ टक्के समांतर आरक्षण त्यांचेसाठीच राखून ठेवून या आरक्षणांतर्गत भूकंपग्रस्तांसाठी ठेवलेले आरक्षण काढून भूकंपग्रस्तांसाठी स्वतंत्रपणे २ टक्के समांतर आरक्षण लागू करण्यात आले आहे. आरक्षण सवलतीच्या प्रयोजनार्थ उमेदवारांनी सक्षम प्राधिकाऱ्यांनी (लागू असेल त्याप्रमाणे) प्रदान केलेले प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे.

(J) **लहान कुटुंबाचे प्रतिज्ञापत्र** –

i) विहित नमुन्यानुसार साध्या कागदावर टंकलिखित करून प्रतिज्ञापत्र सादर करावे.

ii) प्रतिज्ञापत्रात नमूद केल्यानुसार हयात असलेल्या अपत्यांची संख्या दोन पेक्षा अधिक असेल तर दि. २८ मार्च २००६ व तद्नंतर जन्माला आलेल्या अपत्यामुळे उमेदवार शासकीय सेवेतील नियुक्तीसाठी अपात्र ठरविण्यात येईल.

(K) **ओळखपत्राबाबत** -

कागदपत्र पडताळणीच्या वेळी स्वत:च्या ओळखीच्या पुराव्यासाठी स्वत:चे आधार कार्ड, निवडणूक आयोगाचे ओळखपत्र, पासपोर्ट, पॅनकार्ड किंवा स्मार्ट कार्ड प्रकारचे ड्रायव्हींग लायसन्स, महाविद्यालयात शिकत असलेले ओळखपत्र यापैकी किमान कोणतेही एक ओळखपत्र व त्याची छायांकित प्रत सोबत आणणे अनिवार्य आहे.

(L) **संगणक हाताळणी/वापराबाबतचे ज्ञान** – महाराष्ट्र नागरी सेवा (संगणक हाताळणी/वापराबाबतचे ज्ञान आवश्यक ठरविण्याबाबत) नियम १९९९ मधील तरतुदीनुसार शासनाने वेळावेळी आवश्यक ठरविलेली संगणक अर्हता धारण करणे आवश्यक राहील.

## (M) **प्रमाणपत्र पडताळणीच्या वेळी सादर करावयाची कागदपत्रे** :

१. ऑनलाईन प्रणालीद्वारे कोणतीही कागदपत्रे सादर करण्याची आवश्यकता नाही. अर्जात केलेल्या दाव्यानुसार विहित टप्प्यावर संबंधित कागदपत्रांच्या आधारे पात्रता तपासण्याच्या अधीन राहून उमेदवाराची गुणवत्ता, प्रवर्ग, शैक्षणिक अर्हता, वयोमर्यादा व अन्य पात्रतेच्या अटींच्या अधीन राहून निव्वळ तात्पुरत्या स्वरुपात निवड करण्यात येईल.

२. प्रमाणपत्र पडताळणीच्या वेळी उमेदवारांनी पात्रतेसंदर्भात खालीलप्रमाणे कागदपत्रे सादर करणे आवश्यक आहे. –

i) वयाचा पुरावा : माध्यमिक शालांत परीक्षेचे प्रमाणपत्र/शाळा सोडल्याचा दाखला इत्यादी.

ii) शैक्षणिक व व्यावसायिक अर्हता इ. चा पुरावा :

a) माध्यमिक शाळा प्रमाणपत्र (एस.एस.सी.) परीक्षेचे किंवा तत्सम समकक्ष परीक्षेच्या बाबतीत संबंधित मंडळाचे गुणपत्रक/प्रमाणपत्र.

b) उच्च माध्यमिक शाळा प्रमाणपत्र परीक्षा (एच.एस.सी.) किंवा तत्सम समकक्ष परीक्षेचे गुणपत्रक/प्रमाणपत्र.

c) पदवी किंवा पदविका परीक्षांच्या बाबतीत प्रत्येक परीक्षेचे मंडळ/विद्यापीठ/सक्षम प्राधिकाऱ्याने साक्षांकित केलेले गुणपत्रक व प्रमाणपत्र.

d) पदव्युत्तर पदवी परीक्षेचे विद्यापीठ / सक्षम प्राधिकरणाचे गुणपत्रक/प्रमाणपत्र. (लागू असलेले.)

e) राज्य व केंद्र शासनाने घेतलेल्या शिक्षक पात्रता परीक्षेचे (TET किंवा CTET) पात्र असल्याबाबतचे प्रमाणपत्र. (लागू असेल तेथे)

f) अभियोग्यता व बुद्धिमत्ता चाचणी (TAIT) परीक्षेचे गुणपत्रक.

iii) महाराष्ट्र राज्यात अधिवास असल्याचे प्रमाणपत्र (Domicile Certificate)

iv) कागदपत्र पडताळणीच्या वेळी स्वतःच्या ओळखीच्या पुराव्यासाठी स्वतःचे आधार कार्ड, निवडणूक आयोगाचे ओळखपत्र, पासपोर्ट, पॅनकार्ड किंवा स्मार्ट कार्ड प्रकारचे ड्रायव्हींग लायसन्स,महाविद्यालयात शिकत असलेले ओळखपत्र इ., यापैकी कोणतेही एक ओळखपत्र व त्याची छायांकित प्रत सोबत आणणे अनिवार्य आहे.

v) मागासवर्गीय उमेदवार असल्याबाबतचा पुरावा (फक्त मागासवर्गीय उमेदवारांसाठी)

a) अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, विमुक्त जाती (अ), भटक्या जमाती (ब), भटक्या जमाती (क), भटक्या जमाती (ड), विशेष मागास प्रवर्ग व इतर मागास वर्ग, सामाजिक व

आर्थिकदृष्टया मागासवर्ग (SEBC) म्हणून संबंधित सक्षम प्राधिकाऱ्याने दिलेल्या जातीच्या प्रमाणपत्राची प्रत.

b) विमुक्त जाती (अ), भटक्या जमाती (ब), भटक्या जमाती (क), भटक्या जमाती (ड), विशेष मागास प्रवर्ग, इतर मागास वर्ग तसेच सामाजिक व आर्थिकदृष्टया मागासवर्ग प्रवर्गातील तसेच खुल्या प्रवर्गातील आर्थिकदृष्टया दुर्बल घटकातील उमेदवारास सक्षम प्राधिकाऱ्याने प्रदान केलेले उच्च व उन्नत गटात मोडत नसल्याचे प्रमाणपत्र (Non Creamy Layer Certificate) सादर करणे आवश्यक राहील.

c) SC, ST, ST PESA या प्रवर्गातील उमेदवारांना non creamy layer प्रमाणपत्राची आवश्यकता नाही.

vi) दिव्यांग व्यक्ती असल्याचा पुरावा :

a) अपंग व्यक्ती (समान संधी, हक्काचे संरक्षण व संपूर्ण सहभाग) नियम, १९९५ व तद्नंतर या संदर्भात वेळोवेळी निर्गमित केलेल्या शासन निर्णयानुसार तसेच विहित करण्यात आलेल्या पद्धतीनुसार दिव्यांगत्वाचे प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक राहील.

b) शासन निर्णय, सार्वजनिक आरोग्य विभाग क्र. अप्रकि २०१२/प्र.क्र. २९७/आरोग्य ६, दिनांक ६ ऑक्टोबर २०१२ अन्वये शासनाने निर्गमित केलेल्या निर्णयानुसार (Software for Assessment of Disability Maharashtra - SADM) या नवीन संगणक प्रणालीद्वारे वितरित करण्यात आलेले नवीन नमुन्यातील दिव्यांगत्वाचे प्रमाणपत्र सादर करणे अनिवार्य राहील.

c) दिव्यांग व्यक्तीसाठी असलेल्या आरक्षणाचा अथवा दिव्यांग व्यक्तीसाठी असलेल्या वयोमर्यादेतील सवलतीचा फायदा घेऊ इच्छिणाऱ्या उमेदवारांनी विहित नमुन्यात सक्षम प्राधिकाऱ्याने प्रदान केलेले प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक राहील.

d) दिव्यांग व्यक्तींसाठी असलेल्या आरक्षणाचा व वयोमर्यादेतील सवलतीचा लाभ मिळविण्यासाठी दिव्यांगत्त्वाचे प्रमाण किमान ४०% असणे आवश्यक आहे.

e) दिव्यांग उमेदवारांसंदर्भात ग्रामविकास व जलसंधारण विभागाकडील शासन निर्णय दि. १४/१/२०११ सोबतचे परिशिष्ट "अ" व शासन शुद्धिपत्रक दि. २९/१२/२०१८ मध्ये नमूद केलेले शारीरिक पात्रतेचे (वर्गवारी) निकष लागू राहतील.

vii) माजी सैनिक असल्याचा पुरावा :

a) माजी सैनिकांसाठी असलेल्या वयोमर्यादेचा फायदा घेऊ इच्छिणाऱ्या उमेदवारांनी विहित नमुन्यात (लागू असेल त्याप्रमाणे) सक्षम प्राधिकाऱ्याने प्रदान केलेले प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे.

b) माजी सैनिक उमेदवाराने (अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती वगळून) आरक्षणाचा लाभ घेण्यासाठी अर्ज केला असेल तर संबंधित प्रवर्गातील उमेदवारांप्रमाणे माजी सैनिकांनाही सक्षम प्राधिकाऱ्याने प्रदान केलेले उच्च व उन्नत गटात मोडत नसल्याचे प्रमाणपत्र (non creamy layer certificate) नियमानुसार सादर करणे आवश्यक राहील.

viii) अमागास महिला आरक्षणासाठी पात्र असल्याचा पुरावा :

a) महिलांसाठी आरक्षित पदाकरिता दावा करणाऱ्या उमेदवारांनी महिला आरक्षणाचा लाभ घ्यावयाचा असल्यास त्यांनी अर्जामध्ये न चुकता महाराष्ट्राचे अधिवासी (Domicile) असल्याबाबत तसेच उच्च व उन्नत गटात मोडत नसल्याबाबत (अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती व अनुसूचित जमाती पेसा वगळून) स्पष्टपणे दावा करणे आवश्यक आहे.

b) सक्षम प्राधिकाऱ्याने प्रदान केलेले उच्च व उन्नत गटात मोडत नसल्याचे प्रमाणपत्र (non creamy layer certificate) नियमानुसार सादर करणे आवश्यक राहील.

ix) खेळाडूसाठीच्या आरक्षणाकरिता पात्र असल्याचा दावा –

a) अत्युच्च गुणवत्ताधारक खेळाडूंसाठी आरक्षित पदावर दावा करणाऱ्या उमेदवारांनी विहित नमुन्यात (लागू असेल त्याप्रमाणे) सक्षम प्राधिकाऱ्यांनी प्रदान केलेले प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक राहील.

b) खेळाडूंसाठी आरक्षित पदाकरिता दावा करणाऱ्या उमेदवारांनी त्यांची पात्र खेळाडू असल्याबाबतची प्रमाणपत्रे पडताळणीपूर्वी संचालक, क्रीडा व युवक सेवा संचालनालय, पुणे अथवा सक्षम प्राधिकाऱ्याकडून प्रमाणित करुन घेणे आवश्यक आहे.

c) खेळाडूंसाठी आरक्षित पदांकरिता दावा करणाऱ्या उमेदवारांना शासन निर्णय शालेय शिक्षण विभाग व क्रीडा विभाग दि. १ जुलै २०१६ व दि. १८ ऑगस्ट २०१६ मधील क्रीडा विषयक अर्हतेच्या तरतुदी लागू राहतील.

x) विवाहित स्त्रियांच्या नावात बदल झाल्याचा पुरावा –

विवाहित स्त्रियांना विवाह निबंधक यांनी दिलेला दाखला किंवा नावात बदल झाल्यासंबंधी अधिसूचित केलेले राजपत्र.

**महत्त्वाचे:**

1) प्रसिद्ध झालेल्या जाहिरातीनुसार संबंधित पदासाठी उमेदवारांनी अर्ज करणे, ऑनलाईन पद्धतीने प्राधान्यक्रम भरणे, आवश्यक माहिती प्रणालीवर अद्ययावत करणे इ. बाबतच्या सूचना पवित्र प्रणालीवर दर्शविण्यात येत आहेत. उमेदवारांनी नियमितपणे पवित्र प्रणालीवर उमेदवारांसाठी वेळोवेळी दिलेल्या सूचना विचारात घ्याव्यात.

2) वरील सूचना दि.१९/०६/२०१९ पर्यंत असणा-या तरतुदीनुसार देण्यात आलेल्या आहेत, शासन निर्णय, मा.न्यायालयाचे आदेशानुसार बदल झाल्यास सुधारित सूचना प्रणालीवर उपलब्ध करण्यात येतील याची उमेदवारांनी नोंद घ्यावी.

----//------